विद्युत निरीक्षणालयातील अधीक्षक अभियंता, गट-अ (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांना निवडश्रेणी वेतनस्तर लागू करणेबाबत. (निवडसूची वर्ष २०२२-२३)

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
शासन आदेश क्रमांक- मुविनि-२०२६/प्र.क्र.६० /ऊर्जा-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई.
दिनांक: १० ऑगस्ट, २०२६.

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही/प्र.क्र.१५९/कार्या-१२, दि.१.०८.२०१९.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दि. १३.०२.२०२३.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. निपानि-२०२३/प्र.क्र.१३/कार्या-१२, दि.२८.०३.२०२३.
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९, दि. ०२.०६.२०२५.
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र क्र. ईसबी-११२६/ प्र.क्र.१०२/ आस्थामं, दि.२८.०७.२०२६.

प्रस्तावना:-

संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-२ मधील शिफारशीनुसार, गट-अ मधील वेतनस्तर एस-२० व त्यापुढील संवर्गाच्या पदोन्नतीमधील कुंठीतता दूर करण्यासाठी या संवर्गांना निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये गट-अ मधील वेतनस्तर एस-२० व त्यापुढील संवर्गाना निवडश्रेणी वेतनस्तर मंजूर करण्याबाबतची कार्यपद्धती व पात्रतेच्या अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यानंतर, "वेतनत्रुटी निवारण समितीच्या २०२४" च्या अहवालातील शिफारशींबाबत संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयाद्वारे निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, ऊर्जा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विद्युत निरीक्षणालयातील अधीक्षक अभियंता, गट-अ (एस-२५: रु.७८८००-२०९२००) या संवर्गातील २५% पात्र अधिकाऱ्याला २०२२-२३ या निवडसूची वर्षात निवडश्रेणी वेतनस्तर (एस-२७: रु.१२३१००-२१५९००) लागू करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश:-

ऊर्जा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विद्युत निरीक्षणालयातील अधीक्षक अभियंता, गट-अ (राजपत्रित) **(वेतनश्रेणी एस-२५: ७८८००-२०९२००)** या संवर्गातील खालील नमूद अधिकाऱ्यास त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून **"एस-२७ : रू. १२३१००-२१५९००"** हा निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे:

अ. क्र.	ज्येष्ठता क्रमांक (दि.११.०७.२०२२ रोजी प्रसिध्द ज्ये. सूचीतील ज्ये. क्र.)	अधिकाऱ्यांचे नाव	प्रवर्ग	एस-२७ निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यात आलेला दिनांक
१	१	श्री. दिनेश ज. खोंडे **(से. नि. दि.३१.०८.२०२६)**	अ. जा.	दि. २८.०३.२०२३

०२. उपरोक्त तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांना मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधीन राहून निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यात येत आहे.

०३. उपरोक्त अधिकाऱ्यांची वेतननिश्चिती त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ११ (४) नुसार संबंधित कार्यालयाकडून करण्यात यावी. वरीलप्रमाणे अनुज्ञेय व देय ठरणारे वेतन व भत्ते तसेच त्यांच्या थकबाकीची रक्कम, संबंधित अधिकारी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयातील वेतन व भत्त्यांची देयके ज्या लेखाशीर्षातून आहरित व संवितरीत करण्यात येतात, त्याच लेखाशीर्षाखालील उपलब्ध अनुदानातून खर्ची टाकण्यात यावी.

०४. सदर शासन आदेश आस्थापना मंडळ क्र. २ च्या दि. २८.०७.२०२६ रोजीच्या बैठकीतील शिफारशीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८१०१२१९४३६६५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVINASH RAJESH ATKAD

Digitally signed by AVINASH RAJESH ATKAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=F772EE0A28E62B88C18153A71C018DB8CA85BB88519F9C9732879CD03483D005, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7DFB83DE598E6DA39C6F3759E6943FB264003EB8BAFCBA24102A6D87367C3EA1, cn=AVINASH RAJESH ATKAD
Date: 2026.08.10 12:20:41 +05'30'

(अविनाश रा. आतकड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई.
९. सह सचिव (ऊर्जा-१), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, छत्रपती संभाजीनगर.
११. लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
१३. निवडनस्ती (ऊर्जा-१).